# रे.के.नं.६४/२०१८ मध्ये नि.क्र.१ वर आदेश.

सुरेश नाना कराडे वि. अनिल पांडुरंग भुसाणे वगैरे.
(सीएनआर क्र.**MHRG**13000-423-2018)

०१. प्रस्तुतची फिर्याद फिर्यादी यांनी आरोपी क्र.१ ते १० यांचे विरुध्द भा. द. वि. कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० ब, १४९ अन्वये दाखल केली आहे.

०२. सदर प्रकरणी फिर्यादी हे समाज सेवक असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. त्यांची मुख्य फिर्याद ही श्रीवर्धन शहरातील रविंद्र नारायण राऊत माध्यमिक व कनिष्ठ महाविदयालय या शैक्षणिक संस्थेमध्ये पालकांची फसवणुक होत असल्याबाबत आहे. सदर फसवणुक म्हणजे संस्थे मार्फत विदयार्थी व पालकांकडून जून महिन्यानंतर पालक सभा घेवून अनाधिकाराने स्कुल डेव्हलपमेंट फंड तसेच देणगी स्वरुपात हजारो रुपये आरोपी यांनी स्वतःच्या फायदयाकरीता व संगनमताने जमवून त्या रकमेचा अपहार केल्याचे कथन केले आहे. त्या करीता त्यांनी खोटेनाटे दस्तऐवज तसेच मुळ दस्तऐवजात फेर बदल केल्याचे नमुद आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, ऑडीटर यांच्या सहाय्याने त्यांनी लाखो रुपयांचा अपहार केला आहे. ऑडीटमध्ये दाखवण्यात आलेल्या रकमा हया प्रत्यक्ष गैरमार्गाने जमा केलेल्या रकमा बरीचशी तफावत आढळून आली आहे.

०३. फिर्यादी यांनी आरोपी क्र.१ हे संस्थेचे १५ ते २० वर्षे अध्यक्ष म्हणून कार्यरत असल्याचे कथन करुन इतर आरोपींना बगलबच्चे म्हटलेले आहे.

०४. फिर्यादी यांनी आरोपींच्या भ्रष्टाचारा विरुध्द तसेच आर्थिक अपहाराबद्दलची माहिती सन २०१० ते २०१८ पर्यंतच्या कालावधीतील

माहितीच्या अधिकारामधून गोळा केलेली आहे.

०५.            सदर आरोपी क्र.१ ते ६ यांचे ऑडीटर तसेच स्कुल कारकुन पांगारकर यांच्या मदतीने खोटे व बनावट रिपोर्ट तयार करुन शिक्षक, विदयार्थी तसेच शिक्षणाधिकारी यांची फसवणूक केली आहे असे कथन करुन त्यांनी ते ऑडीट रिपोर्ट दाखल करत असल्याचे कथन केले आहे.

०६.            त्यांनी आरोपी क्र.१ हे संस्थेचे अध्यक्ष, आरोपी क्र.२ उपाध्यक्ष, आरोपी क्र.३ माजी उपाध्यक्ष, आरोपी क्र.४ संस्थेचा विदयमान सेक्रेटरी, आरोपी क्र.५ विदयमान लोकल कमिटीचा अध्यक्ष, आरोपी क्र.६ लोकल स्कुल कमिटीमधील माजी अध्यक्ष असल्याचे कथन आहे. त्यांनी पुढे आरोपी क्र.७, ८, ९ व १० हे सन २०१० ते २०१८ पर्यंत मुख्याध्यापक या नात्याने कार्यभार सांभाळत असल्याचे नमुद केले आहे. सदर आरोपी हायस्कुल अनुदानित असताना अनुदान रद्द केल्याचा बनाव करुन पालक व विदयार्थी यांच्याकडून लाखो रुपयांची देणगी वसुल करुन त्या रकमेचा अपहार केल्याचे नमुद केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर संस्थेचा कारभार हे नियोजीत संचालक मंडळ चालवते. त्या कामी कोणताही धोरणात्मक निर्णय पालक सभेला घेता येत नाही.

०७.            त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, फिर्यादीहे पालक असून त्यांची मुलगी तसेच गावातील विदयार्थी व विदयार्थ्यांनी फिर्यादी यांच्याकडे आरोपी शाळा सुधार निधी व देणगीचे नावा खाली लाखो रुपयाची फसवणूक करत असल्याची तक्रार दिली.

०८.            त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, आरोपी हे शिक्षक व पालक सभा घेवून त्यामध्ये केवळ त्यांच्या गटातील ४० ते ५० पालकांना

बोलवतात. ते विदयार्थ्यांची पटसंख्या १४०० ते १५०० असताना केवळ मर्जीतील ४० ते ५० पालकांना पालक सभा झाल्याचे दाखवण्याकरीता आमंत्रित करतात. सदर सभेमध्ये मागील सभेचे इतिवृत्त संमत करणे, शालेय भौतिक गरजा, विदयार्थ्यांच्या प्रती व अडीअडचणी बाबत तसेच शैक्षणिक उपक्रमाबाबत विचार करणे अशी पुर्व नियोजीत कामे प्रत्येक पालक शिक्षक संघाचे मिटींगमध्ये घेवून शाळेचे अनुदान बंद झाल्याचा बहाणा करुन शाळा सुधारणेने तसेच वेगवेगळया खर्चाचे व शालेय स्पर्धा, प्रशासकीय कामासाठी येणारा खर्च, पालकांना विदयार्थ्यांचे शैक्षणिक विकासाचे अमीष दाखवून निधी गोळा केला जातो. त्यांनी असेही कथन केले आहे की, शिक्षक हे अनुदानित पगार घेण्या पलीकडे काहीही खर्च करत नाहीत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रत्येक ऑडीट रिपोर्ट, गोळा केलेला निधी व ऑडीट रिपोर्टमध्ये दाखवलेली तफावत फिर्यादी यांच्या ध्यान्यात आल्यावर त्यांनी आरोपींची भेट घेतली. त्यावेळी फिर्यादी यांच्यावर आरोपी क्र.१ ते ६ यांना ब्लॅकमेल करत असल्याचा आरोप लावण्यात आला. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर वेळोवेळी घेण्यात येणा–या परीक्षांचा खर्च, प्रशासकीय कामाकरीता येणारा खर्च, शालेय अडीअडचणीवर मात करण्याकरीता प्रत्येक पालक सभेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या प्रत्येक विदयार्थ्यांच्या पालकांकडून चालू शैक्षणिक वर्षाकरीता रुपये तीनशे गोळा करण्याबाबत नवनिर्वाचीत संचालक मंडळाने निर्णय घेण्या ऐवजी पालक सभेमध्ये निर्णय घेवून आरोपी यांनी विदयार्थी व पालक व शासनाची फसवणूक केली आहे.

०९. त्यांनी खालील प्रमाणे आरोप केलेले आहेत.

*ए. सन २००६ मध्ये हस्तकला विषय शिकवण्याचा बंद केलेला असताना सन २००७ मध्ये विमल काशीनाथ पाटोळे यांना मराठी, हिंदी व समाज शास्त्र विषय शिकवण्याचे काम देण्यात आले होते.*

*बी. उमाकांत सदाशिव गुंजाळे या शिक्षकांची आरोपी क्र.१ ते ६ यांनी अधिकार नसताना भरती केली.*

*सी. आरोपींनी इयत्ता पाचवी ते दहावी या विदयार्थ्यांकडून शालेय विकास निधी म्हणून प्रत्येकी रुपये दोनशे गोळा केले. मात्र विदयार्थ्यांना फक्त रुपये शंभरची विकास निधीची पावती देण्यात आली.*

*डी. सदर आरोपींनी विदयार्थ्यांकडून रुपये २,२६,०००/- इतकी रक्कम गोळा करुन केवळ १,६२,९३०/- रुपये इतकीच रक्कम गोळा केल्याचे दाखवले.*

*ई. सन २०११ चे वार्षिक ऑडीटमध्ये वर रकमेपैकी रुपये ४९६००/- इतकी रक्कम शालेय विकास निधी वापरल्याचे दर्शवले आहे.*

*एफ. महिला विदयार्थ्यांना मोफत शिक्षणाची तरतुद असताना इयत्ता अकरावी मध्ये शिकत असलेली कु. जुवेली विरकुड हिचेकडून निधी गोळा केला आहे.*

*जी. अकरावी व बारावीच्या विदयार्थ्यांकडून ५००/-, १०००/-, १५००/-, २५००/-, ३०००/-, ३५००/- इतका निधी गोळा केला असून तो निधी शाळेच्या विकासाच्या कोणत्या नावाखाली वापरला याचे विवरण संस्थेने दिले नाही.*

*एच. फिर्यादी यांची मुलगी सन २००७ साली इयत्ता सातवीमध्ये शिकत असताना तिची सुध्दा फसवणुक केली आहे.*

*आय. सन २००६ पासून जिमखाना व लायब्ररी उपलब्ध नसताना अकरावीच्या विदयार्थ्यांकडून प्रत्येकी रुपये १५०/– वसुल करत असून सन २००६ ते २०१८ पर्यंत अकरावी व बारावीपर्यंत प्रतिवर्षी रुपये ५० ते ६० लाख इतकी रक्कम गोळा करुन विदयार्थ्यांची फसवणुक केली.*

*जे. पालक सभेची नोंद व त्यावरील इतिवृत्ताची नोंद शाळेच्या रजिस्टरला न ठेवता को–या कागदावर अहवाल लिहून तसेच ठराव मंजूर करुन बनाव केला.*

*के. शिक्षणाधिकारी यांनी शाळेला नियमबाहय रक्कम परत करण्याबाबत आदेश केलेले आहेत.*

*एल. कु. क्रांती महाडीक व जुईली विरकुड यांचेकडून प्रत्येकी ५००/– रुपये तर दक्षता कडु हिच्याकडून रुपये १५००/– निधी घेतलेला आहे.*

*एम. दिनांक ०९/०२/२०१२ रोजी पालक शिक्षकांच्या सभेमध्ये अल्पसा निधी शाळेने घेतल्याची कबुली दिली आहे.*

*एन. वापरलेल्या निधीचा लेखाजोखा आरोपी यांनी फिर्यादी व पालक यांना दिलेला नाही.*

याप्रमाणे आरोप केलेले आहे. त्यांनी तात्कालीन मुख्याधिकारी श्रीमती बोडस यांनी माहिती दिल्यानंतर त्याबाबत दिलेल्या उत्तरांकरीता फिर्यादी हे प्रत्यक्ष शाळेत जावून भेटले असता त्यांना काय करायचे ते करा आम्ही भिकारडया धमक्यांना घाबरत नाही, केवळ

ब्लॅकमेलींग करता वेटीस धरले आहे असे आरोपी क्र.१ यांना फिर्यादी यांना धमकावले.

१०. त्यांनी माहितीच्या अधिकारात प्राप्त रकमेचे तपशील फिर्यादीत दिलेले आहेत. त्याच बरोबर त्यांनी रकमेमध्ये तफावत असल्याचे देखील त्याच्यात दिले आहे.

११. या प्रकरणी त्यांनी आरोपींनी केलेल्या गुन्हयां विरुध्द शिक्षण अधिकारी / शिक्षक संचालक / उप शिक्षक संचालक मुंबई यांची कोणतीही पुर्व परवानगी घेतलेली नाही.

१२. त्यांनी पोलिसांना तक्रार देवून देखील पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही.

१३. या प्रकरणी सदरचे प्रकरण माझे पुर्वाधिकारी यांनी सत्यापनाकरीता ठेवले होते. सदर फिर्यादी यांचे, साक्षीदार प्रतिक्षा कडू यांचे लेखी सत्यापन या प्रकरणी दाखल आहे. या प्रकरणी साक्षीदार आंबीका करडे यांची साक्ष नोंदवलेली आहे. त्यांनी त्यांच्या जबाबात त्या नववीमध्ये शिकत असताना अनिल भुसाणे व सातपुते सर यांनी शाळेला देणगी देण्याबाबतचे सांगितल्याचे सांगितले. तसेच देणगी दिली नाही तर निकाल अडवून ठेवला जात असल्याचे व परीक्षेला बसु दिले जात नसल्याचे सांगितले. त्यांनी विदयार्थी पालक मेळाव्या वेळी देणगी दिली नाही तर शाळा बंद होईल असे सांगत असल्याचे सांगितले. त्यांना दिनांक २१/०७/२०१२ रोजी शाळेमध्ये दोनशे रुपये घेवून केवळ १००/– रुपयाची पावती दिल्याचे सांगितले. तसेच शाळेत जिमखाना नसताना जिमखाना फी भरल्याचे सांगितले.

१४. साक्षीदार प्रतिक्षा कदम यांनी त्यांची मुलगी ऋतुजा कदम ही इयत्ता नववीमध्ये शिकत असताना त्यांच्या मुलीने त्यांच्याकडे दोनशे रुपये मागितल्याचे व त्या शिवाय प्रगती पुस्तक मिळणार नसल्याचे शाळेत सांगितल्याचे सांगितले होते. त्यांनी या बाबत फिर्यादी सुरेश करडे यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावर सही केली असल्याचे सांगितले.

१५. साक्षीदार रविंद्र ढाकणे यांनी न्यायालयामध्ये सन २००८ ते ०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ या सालातील ऑडीट अहवाल, फिर्यादी सुरेश करडे यांच्या तक्रारीमुळे लेखा परिक्षण झाल्याबाबतचा अहवाल तसेच माहिती आयोग कोकण खंडपीठ यांचा निर्णय दाखल केलेला आहे.

१६. साक्षीदार भाऊसाहेब लिंबाजी थोरात शिक्षण अधिकारी माध्यमिक यांनी त्यांच्या जबाबात फिर्यादी यांनी त्यांच्याकडे तक्रारी अर्ज दिल्यानंतर लेखाधिकारी लेखा परिक्षण पथक रायगड जिल्हा माध्यमिक शिक्षक यांना र. ना. राऊत माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय श्रीवर्धन या शाळेचे लेखा परिक्षण करण्याचे आदेश दिल्याचे सांगितले. त्यांच्याकडे लेखाधिकारी माधुरी पांगळे यांचा चौकशी अहवाल दिनांक १७/०१/२०१९ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी सदर अहवालाच्या अनुषंगाने अपहार झाल्याचे दिसून येत नसल्याचे फिर्यादी यांना कळवल्याबाबत सांगितले. त्यानंतर त्यांनी फिर्यादी सुरेश करडे यांनी दिनांक १५/०२/२०२१ रोजी पुन्हा त्यांच्याकडे अर्ज दाखल करुन दिनांक २२/०९/२०१७ बाबतच्या अर्जाबाबत अभिप्राय कळवण्यास सांगितल्यामुळे त्यांनी पुन्हा दिनांक २७/०३/२०१९ रोजी माधवी बांदल , तत्कालीन लेखा परिक्षक यांना पुन्हा चौकशीचे आदेश दिल्याचे सांगितले.

त्यांनी त्या बरोबरच दिनांक ३०/०५/२०१९ रोजी सुनावणी घेवून दिनांक १७/०६/२०१९ रोजी आदेश केल्याचे सांगितले. त्यांनी त्यांना सदर आदेशानंतर दिनांक २४/०७/२०१९ रोजी कार्यवाहक श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक आणि सहाय्यक मंडळ यांनी पुर्तता केल्याचे अहवाल दिल्याचे सांगितले. या प्रकारे आदेशिका पुर्व पुरावा फिर्यादी यांनी नोंदवला आहे.

१७. सदर फिर्याद ही शाळा व शाळेचे व्यवस्थापक याच्या संदर्भातील आहे. सदर फिर्याद ही फसवणुक या अनुषंगाने दाखल असून सदर प्रकरणी आरोपी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक आहेत. सदर शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था कोणत्या कायदया अंतर्गत नोंदलेली आहे याचा उल्लेख फिर्यादीने केलेला नाही. तथापि, सदर दाखल कागदपत्रांवरुन सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियमा खाली नोंदणी क्र. ई ५९ कुलाबा या क्रमांकाने दिनांक २१/१०/१९५६ रोजी स्थापन झालेली असल्याचे दिसून येते. उर्वरित आरोपी हे शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक म्हणजेच नोकर वर्ग आहेत.

१८. या प्रकरणी फिर्यादीमध्ये नमुद घटनाक्रम पाहता सदर संस्थेचे कामकाज हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनीयमन अधिनियम २०११ मधील तरतुदी नुसार चालणे अपेक्षित आहे. या प्रकरणी दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन तसेच साक्षीदार शिक्षण अधिकारी भाऊसाहेब थोरात यांच्या जबाबावरुन त्यांनी दिनांक २७/०३/२०१९ रोजी फेर चौकशीचे आदेश दिल्याचे त्यांनी सांगितले आहे. याचाच अर्थ शिक्षण अधिकारी यांचा अपहार दिसून येत नसल्याबाबतचा दिनांक २८/०२/२०१९ रोजीच्या पत्रातील निष्कर्ष हा अंतिम आहे असे म्हणता येणार नाही. या सर्व प्रकरणामध्ये सदर २०११ च्या अधिनियमाचा कोठेही उल्लेख केलेला दिसून येत नाही किंवा

त्या प्रकारे कामकाज सुरु असल्याबाबत शाळेकडून प्राप्त पत्रांमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी फिर्यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे व इतर साक्षीदारांचे कथनाप्रमाणे शाळेमध्ये रकमा स्विकारण्याच्या प्रकारास कोणत्याही निश्चित कायदेशीर नियमावलीची जोड दिसून येत नाही. त्यामुळे साक्षीदारांनी कथन केल्याप्रमाणे पावती न देणे, किंवा जी सुविधा उपलब्ध नाही त्याबाबत फी वसुल करणे असा प्रकार प्रथमदर्शनी दिसून येतो.

१९. या प्रकरणी आरोपी क्र.१ ते ४ हे संस्थेच्या वतीने कामकाज पाहत असल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसून येते. या प्रकरणी आरोपी क्र.७ ते १० हे शाळेमधील मुख्याध्यापक असल्याचे फिर्यादीमध्ये नमुद आहे. तथापि, सदर मुख्याध्यापक हे अनुदानित शाळेतील नोकरदार असून त्यांच्यावर केलेला आरोप म्हणजे त्यांनी आरोपी क्र.१ ते ६ च्या दबावाखाली काम केल्याबाबत आहे. त्यांचे विरुध्द प्रकरण दाखल करण्यापुर्वी त्यांचा सहभाग हा हेतु पुर्वक आहे किंवा कसे याची पडताळणी त्यांचे क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ अन्वये पुर्व परवानगी आवश्यक असल्यामुळे त्यांचे बाबत या प्रकरणी दखल घेता येणार नाही. या परिस्थितीत आरोपी क्र.७ ते १० हे नोकरदार असल्याने त्यांचे विरुध्द प्रथमदर्शनी पुरावा दिसून येत नाही. या प्रकरणातील आरोपी क्र.६ हे मयत असल्याने त्यांचे विरुध्द प्रस्तुतचे प्रकरण या पुर्वीच ॲबेट झालेले आहे. या प्रकरणी वर नमुद केल्याप्रमाणे संस्थेचे कामकाज आरोपी क्र.१ ते ६ यांच्या मार्फतच चालत असल्याने सदर प्रकरणातील संस्थेच्या कारभारा बाबतच्या आरोपा बाबत त्यांचीच जबाबदारी येते. या प्रकरणी विदयार्थ्यांकडून रक्कम निश्चित करताना उपलब्ध कायदयातील तरतुदींना बगल देवून विदयार्थ्यांकडून रकमेची वसुली करणे म्हणजे विदयार्थ्यांची व पालकांची फसवणूक आहे. सदर उपलब्ध कायदयाप्रमाणे कामकाज न चालवता सोयीप्रमाणे कागदपत्रांची

निर्मिती करणे हा प्रकार खोटा दस्त ऐवज बनवणे या प्रकारात मोडतो. सदर प्रकरणी शाळेमध्ये जमा होणा–या रकमा या पालकांनी योग्य रितीने शिक्षणासाठी खर्च केल्या जाण्यासाठी भरलेल्या असतात त्यामुळे सदर योग्य विनियोगाची जबाबदारी असताना त्या रकमांचा विनीयोग योग्यरितीने न करणे हा प्रकार फौजदारी पात्र न्यास भंग या सदरामध्ये मोडतो. त्यामुळे अभिलेखावर आलेल्या प्रथमदर्शनी पुराव्यातून आरोपी क्र.१ ते ५ यांचे विरुध्द भा. द. वि. कलम ४०६, ४२०, ४६५, ४६८ अन्वये आदेशिका काढणे योग्य होणार आहे. सबब, आदेश –

:: **आदेश** ::

०१. आरोपी क्र.१ ते ५ यांचे विरुध्द भा. द. वि. कलम ४०६, ४२०, ४६५, ४६८ अन्वये आदेशिका काढण्यात यावी.

०२. आरोपी क्र.६ हे मयत असल्याने त्यांचे विरुध्द सदरचे प्रकरण ॲबेट करण्यात येत आहे.

०३. आरोपी क्र.७ ते १० यांचे विरुध्द सदरचे प्रकरण विना दखल काढून टाकण्यात येते.

श्रीवर्धन. (प्र. ग. लंबे)
दिनांक – ३०/०४/२०२२. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.